## निवडक

### नागेश महारुद्र देवस्थानात आज महाशिवरात्री

टीम दैनिक हेराल्ड



फोंडा, दि. २५ : श्री नागेश महारुद्र देवस्थानात महाशिवरात्री बुधवार दि. २६ रोजी उत्सव परंपरे प्रमाणे साजरा करण्यात येणार आहे.
त्यानिमित्त सकाळी धार्मिक विधी अभिषेक, रात्री चतुष्प्रहारी महापूजा होईल. तसेच दुसऱ्या दिवशी गुरुवार दि. २७ रोजी पहाटे ६ वाजता शिबिकोत्सव, गंगापूजन, रथोत्सव, दुपारी अन्नसंतर्पण रात्री ८ वाजता महारुद्र शिबिकोत्सव, लक्ष्मी नारायण व गणपती पालखी. तरी सर्व भक्तजनांनी उपस्थिती दाखवावी व आशीर्वाद घ्यावा अशी नम्र विनंती

### हरमल नारायणदेव मंदिरात आज भजन

टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. २५ : महाशिवरात्री निमित्त खालचावाडा येथील श्री नारायण देव मंदिरात बुधवार दि. २६ रोजी संध्याकाळी ६ वाजता स्वर संगीत प्रासादिक भजन मंडळ, कोंडुरा वेंगुर्ला यांचा भजन कार्यक्रम होणार आहे. त्यापूर्वी सकाळी धार्मिक विधी, अभिषेक, आरतीतिर्थ प्रसाद होईल. तरी भाविकांनी उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन देवस्थानचे अध्यक्ष राजेश गोकर्णकर यांनी केले आहे.

# डबल ट्रॅकिंग मार्गी लावण्यासाठी सरकारचा नवा डाव

## शास्त्रज्ञांचा विरोध : मात्र सरकारने केली वनवळवणी स्थगिती उठविण्याची मागणी

**बेंगळुरू, दि. २५ :**

पश्चिम घाटाच्या नाजूक परिसंस्थेवर होणाऱ्या परिणामांकडे दुर्लक्ष करून गोवा सरकारने रेल्वे दुहेरी ट्रॅकिंग प्रकल्पासाठी कुळे –काले भागातील १५.६०७७ हेक्टर वनजमिनीच्या वळवणीवरील स्थगिती उठविण्याची मागणी पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाकडे केली आहे.

आज (२६ फेब्रुवारी २०२५) बेंगळुरू येथे होणाऱ्या पर्यावरण आणि वन मंत्रालयाच्या प्रादेशिक सक्षम समितीच्या बैठकीत या विषयावर चर्चा होणार आहे. समिती वन (संरक्षण आणि संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत या प्रकरणाचा आढावा घेणार आहे. गोवा सरकारने २०१९ मध्ये राष्ट्रीय वन्यजीव मंडळाच्या मंजुरीचा दाखला देत, प्रकल्पासाठी पूर्वसंमती असल्याचे नमूद केले आहे. मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी याआधी सांगितले होते की, भारतीय विज्ञान संस्था बेंगळुरू यांनी पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकनात वन्यजीव संवर्धनासाठी आवश्यक उपाययोजना सुचवल्या होत्या. यात बोगद्यांच्या प्रवेशद्वारांवर इलेक्ट्रॉनिक नियंत्रित दरवाजे बसवण्याचा सल्ला देण्यात आला होता, जो रेल्वे अधिकाऱ्यांनी तपासावा, असे सुचविण्यात आले होते.

पर्यावरणतज्ज्ञ आणि शास्त्रज्ञांनी या प्रकल्पाला प्रखर विरोध दर्शवला असून सर्वोच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या केंद्रीय सक्षम समितीने देखील या प्रकल्पावर आक्षेप नोंदवला आहे.केंद्रीय सक्षम समितीच्या अहवालानुसार, दुहेरी ट्रॅकिंगमुळे पश्चिम घाटातील पर्यावरणीय समतोल धोक्यात येईल आणि भगवान महावीर अभयारण्य व मोलेम राष्ट्रीय उद्यानातील महत्त्वाचे वन्यजीव कॉरिडॉर बाधित होतील.

शास्त्रज्ञांनी प्रादेशिक सक्षम समितीला पाठवलेल्या पत्रात प्रकल्पामुळे होणाऱ्या अपरिवर्तनीय पर्यावरणीय हानीवर भर देण्यात आला आहे. यात अधिवासाचे विखंडन, जंगलतोड आणि वन्यजीव मृत्यूदरात वाढ यांचा समावेश आहे. बेंगळुरूस्थित पर्यावरणतज्ज्ञ डॉ. अनुष्का रेगे म्हणाल्या, *हा प्रकल्प पश्चिम घाटाच्या परिसंस्थेवर मोठा परिणाम करेल. या भागातील जैवविविधता आणि स्थानिक समुदायांच्या उपजीविकेवरही गंभीर परिणाम होईल. केंद्रीय सक्षम समितीच्याशिफारशींचे पालन करणे आवश्यक आहे.*

लीड्स विद्यापीठाचे संशोधक डॉ. सिनाड डिसिल्वा यांनी देखील स्थानिक जनतेच्या विरोधाकडे लक्ष वेधले. *गोव्यातील नागरिक सातत्याने या प्रकल्पाला विरोध करत आहेत. स्थानिकांना पर्यावरणीय धोका दिसत असताना सरकारला तो का दिसत नाही? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

केंद्रीय सक्षम समितीच्या अहवालात रेल्वे दुहेरी ट्रॅकिंगच्या आर्थिक व्यवहार्यतेवरही प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. विद्यमान रेल्वे मार्गाचा तीव्र चढ–उतार हा देशातील सर्वाधिक अकार्यक्षम मार्गांपैकी एक आहे. तज्ज्ञांच्या मते, प्रकल्पाचा मुख्य उद्देश सार्वजनिक वाहतूक सुधारण्याऐवजी कोळसा वाहतुकीस प्राधान्य देणारा आहे. विशेषतः, भारत कोळसा आयात कमी करण्याचे धोरण राबवित असताना या प्रकल्पाची उपयुक्तता संशयास्पद ठरत आहे.

पर्यावरणसंवर्धन गटांनी नमूद केले आहे की, गोव्याच्या वाहतूक गरजा सध्या विस्तारित महामार्ग आणि नवीन मोपा आंतरराष्ट्रीय विमानतळाद्वारे पुरेशा प्रमाणात भागवल्या जात आहेत. अशा परिस्थितीत रेल्वे दुहेरी ट्रॅकिंग अनावश्यक असल्याचा त्यांचा युक्तिवाद आहे. गोवा सरकारच्या विनंतीवर आज प्रादेशिक सक्षम समिती अंतिम निर्णय घेणार असल्याने संपूर्ण देशाचे लक्ष या चर्चेकडे लागले आहे. सरकारकेंद्रीय सक्षम समितीच्या निष्कर्षांना मान्यता देते की वन वळवणीसाठी परवानगी मिळवते, यावर पुढील दिशा अवलंबून राहील.

### मुडकुड, आगोंद प्रवासी बस दुपारच्या वेळेत सुरू करण्याची मागणी

टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. २५ :** गेली अनेक वर्षांपासून सुरू असलेली मुडकुड–आगोंद प्रवासी बस अचानक आठ दिवसांपासून दुपारच्या वेळेत बंद ठेवण्यात आली असल्यामुळें विद्यार्थी व प्रवाशांमध्ये प्रचंड नाराजी व्यक्त केली जात आहे. दुपारच्या वेळेत लवकरात लवकर ही बंद करण्यात आलेली फेरी सुरु करावी. स्थानिक आमदार व राज्याचे सभापती तवडकर यानी या प्रश्नी गांभीर्याने लक्ष घालण्याची मागणी या भागातून केली जात आहे. मुळात ही खाजगी बस याठिकाणी व्यवस्थीत सेवा देत होती.
मात्र सरकारच्या सध्या माझी बस या योजनेखाली सुरू होती. सरकार विद्यार्थी वर्गाकरता अन्यत्र बसची सोय करते. याभागातील विद्यार्थी वर्गाकडेच असा भेदभाव का? असा प्रश्न करून बस नसल्यामुळे ऐन गर्मीच्या दिवसात विद्यार्थ्यांना चालत जावे लागते. घरी उशिरा पोहचल्यामुळे शिकवणी व अन्य शालेय वर्गात वेळेत पोहचणे शक्य होत नाही. त्यामुळे लवकरात लवकर बस सुरू करण्याची मागणी स्थानिक देवस्थान समितीचे अध्यक्ष प्रमोद फळदेसाई व अन्य यांनी केली आहे.

# खोतीगाव ग्रामस्थांनी वन विभागाचे बांधकाम थांबवले

टीम दैनिक हेराल्ड

काणकोण: खोतीगाव येथील ग्रामस्थांनी रविवारी विधानसभा अध्यक्ष आणि आमदार रमेश तवडकर यांच्या उपस्थितीत पिपळामळ येथील वन विभागाचे बांधकाम थांबवले . ग्रामस्थांच्या माहितीनुसार, हे काम स्थानिक ग्रामसभेच्या चर्चेविना सुरू करण्यात आल्याने त्यांनी यास विरोध दर्शवला.

खोतीगाव अभयारण्यालगत असलेल्या पिपळामळ परिसरात वन विभागाने जेसीबीच्या साहाय्याने उत्खनन सुरू केले होते, जेथे एका निवासस्थानाचे बांधकाम प्रस्तावित होते. मात्र, ग्रामसभेत कोणतीही चर्चा न करता हे काम सुरू करण्यात आल्याने ग्रामस्थ संतप्त झाले. त्यांनी तातडीने सरपंच वृंदा वेळीप यांच्याशी संपर्क साधून घटनास्थळी येण्याची विनंती केली. परंतु सरपंचांनी प्रत्यक्ष येण्याचे आश्वासन दिले, पण त्या घटनास्थळी दाखल झाल्या नाहीत. त्यामुळे ग्रामस्थ अधिक संतप्त झाले आणि वनरक्षकाला याबाबत खुलासा करण्यास व बांधकाम थांबवण्याचे आदेश देण्यास सांगितले.

ग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेतल्याने वनरक्षक घटनास्थळावरून पळून गेला, असे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. त्याचवेळी खोतीगाव पंचायतीची ग्रामसभा सुरू होती, त्यामुळे ग्रामस्थांनी तेथे धाव घेतली आणि हा मुद्दा उपस्थित केला. माजी सरपंच आणि युनायटेड ट्रायबल ट्रेडिशनल असोसिएशन चे उपाध्यक्ष उमेश गावकर यांनी सरपंचांनी घटनास्थळी न आल्याचा आरोप केला. ग्रामस्थांच्या विरोधाची माहिती मिळताच काणकोणचे आमदार आणि विधानसभा अध्यक्ष रमेश तवडकर यांनी घटनास्थळी भेट दिली. मात्र, त्यावेळी वन विभागाचा कोणताही अधिकारी अथवा कर्मचारी उपस्थित नव्हता. तवडकर यांनी ग्रामस्थांना आश्वासन दिले की, स्थानिकांना जर हे बांधकाम नको असेल, तर वन विभागाने कोणतेही काम करू नये. स्थानिकांशी चर्चा झाल्याशिवाय पुढील काम सुरू होणार नाही.

वन विभागाच्या अधिकारी अश्विता देसाई यांनी नंतर घटनास्थळी येऊन स्पष्ट केले की, हे बांधकाम पूर्णपणे कायदेशीर असून गावातील वन कर्मचाऱ्यांसाठी आहे. त्या म्हणाल्या की, ग्रामस्थांनी सहकार्य करावे आणि जंगल संरक्षणाच्या प्रयत्नांना मदत करावी. मात्र, आरटीआय कार्यकर्ते कल्पेश गावकर यांनी याला आक्षेप घेत वन विभागाकडून कोणतीही अधिकृत माहिती न देता काम सुरू करण्यात आल्याचा आरोप केला. त्यांनी सांगितले की, रविवारी सुट्टीच्या दिवशी जेसीबीचा वापर करून हे काम सुरू करण्यात आले, जे संशयास्पद आहे.







+Terms and conditions apply. ##Cashback Offer on purchase of any Honda two wheeler model includes 5% cashback upto maximum of ₹5000 on EMI transactions using HDFC bank credit card and IDFC FIRST bank credit card through Pine Labs machines only. ##Cashback offer valid until 31st March 2025. **The finance scheme is at the sole discretion of the financier, subject to its respective T&Cs. **The offers may be modified or withdrawn at any time without prior intimation. #3 years of standard plus 7 years of free extended warranty only on Activa 110cc and Activa 125cc. #This scheme is offered by authorised Honda 2 Wheelers dealerships only and can be availed on purchase of Activa 110cc and Activa 125cc from authorised Honda 2 Wheelers dealerships. #The offers are applicable in Gujarat, Goa and Maharashtra only. #The offers may be modified or withdrawn at any time without prior intimation. Product shown in the picture may vary from actual product available in the market. Accessories shown in the picture are not part of standard equipment.

**Honda Motorcycle & Scooter India Pvt. Ltd., Registered Office:** Plot No. 1 , Sector - 03, IMT Manesar, Distt. Gurugram, (Haryana) – 122050, India; **Website:** www.honda2wheelersindia.com; **Customer Care:** customercare@honda.hmsi.in

**Honda Exclusive Authorized Dealerships: MAPUSA:** Counto Honda - 7447799507, 9850266777, 9175093474; **BICHOLIM:** Counto Honda - 8806667848; **MARGAO:** Goa Rajee Honda - 0832-2791751-55, 9552988811; **PANJIM:** Priority Honda - 0832-2233551, 8888885157; **MARCELA:** Priority Honda - 08322288944, 7719917776; **PONDA:** Goa Rajee Honda - 9552988822; **VASCO:** Goa Rajee Honda - 9552988833; **XELDEM:** Goa Rajee Honda - 9552988844; **CANACONA:** Goa Rajee Honda - 9881060727.

**For Bulk/Institutional enquiries, please write us at: institutionalsales@honda2wheelersindia.com**